Vol. 1, Issue . 1 / February 2011, pp.135-139

Research Paper - History

ISRJ

# महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदाय आणि श्री संत सावता माळी

**कु. मिनाक्षी व्यंकटेश व्यवहारे**
मु. पो. करकंब,ता. पंढरपूर
जि. सोलापूर

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणी मध्ये वारकरी संप्रदायाचा सिंहाचा वाटा आहे. दरवर्षी वाढते जाणारी वारकऱ्यांची संख्या हे एकच प्रमाण यासाठी पुरेसे ठरेल. वारकरी नसलेल्या महाराष्ट्रावर देखील वारकरी संतांचा, विचारांचा फार मोठा प्रभाव आहे. त्याचे गमक म्हणजे मराठी साहित्य. ५०० वर्षाच्या काळात संतांनी या साहित्यात भर घातली. विठ्ठलावरील साहित्यात संतांनी नाम व भक्तीचा महिमा प्रकट केला आहे. संतमहतांनी सांस्कृतिक, सामाजिक , वाङ्मयीन, धार्मिक कार्य केले. विवेक व नीती या मूल्यांची जोपासना केली. मनुष्यांचा मोठेपणा हा त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर अवलंबून नसतो. त्यासाठी वैयक्तिक चरित्राची संपन्नता व सात्विकता लागते हे सांगितले.

सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन नकाशावर भौगोलिक, नैसर्गिक विविधतेची लयलूट आहे. एका प्रदेशाचा तोंडावळा दुसऱ्याहून भिन्न असा अनुभवायला मिळतो. देश विदेशातील पर्यटनाच्या आकर्षणात जशी या निसर्गरुपी दयाधन, परमेश्वरी स्पर्शाचं औदार्य अनुभवायला हवं असतं तसंच मानवनिर्मित अजोड कलाकृतीच्या जोडीला सांस्कृतिक आणि धार्मिक ऐश्वर्याची शान दाखवणाऱ्या धार्मिक स्थळांचा मोठेपणा कोण नाकारेल? सोलापूर जिल्ह्यामधील अशाच एका छोट्या गावामध्ये धार्मिकतेचा नमुना पहावयास मिळतो. ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक , राजकीय,सांस्कृतिक वारसा लाभलेल्या 'अरण' गावामध्ये धार्मिकता, भक्तीभाव संस्कृतीचा नमुना पहावयास मिळतो. अशा गावचा इतिहास , परंपरा संत शिरोमणी सावता माळी यांचा इतिहास भक्ती या व इतर गोष्टींचा आढावा या शोधनिबंधात सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अरण**

पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी , अरण-भेंड इत्यादी स्थानांमुळे संताची भूमी म्हणून सोलापूर जिल्ह्याचे महत्व आहे. या जिल्ह्यातील माढा या तालुक्याच्या गावापासून नैऋत्य दिशेला १७ कि.मी. अंतरावर 'अरण' हेगाव आहे. 'श्री क्षेत्र अरण' ही संत शिरोमणी सावता महाराज यांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. येथे महाराजांनी संजीवन समाधी घेतली असून त्यांचेभव्य असे समाधी मंदिर आहे. हे गाव सोलापूर-पुणे महामार्ग क्रमांक ९ लगत आहे. पूर्वीच्या कै. बाळासाहेब पटवर्धन यांच्या मिरज संस्थानमधील मोडनिंब तालुक्यातील हे एक गांव . सध्या हे गाव सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात आहे. या क्षेत्रापासून पूर्वेस कुर्डूवाडी-पंढरपूर ब्रॉडगेज रेल्वे मार्गावरील मोडनिंब हे गाव ५ कि.मी. अंतरावर आहे. श्री क्षेत्र पंढरपूर येथून फक्त २५ कि.मी. अंतरावर आहे. तसेच उत्तरेस २ कि.मी. अंतरावर मेंड हे सावता महाराज यांचे सासूरवाडीचे गाव आहे. त्यामुळे या क्षेत्राचा उल्लेख अरण-भेंड असाही होतो.

अरण गावचा इतिहास तसा फार जुना आहे. संत कवी दासगणू यांच्या किर्तनातून 'जेथेरण नाही तेअरण' असेविचार व्यक्त केलेआहेत. निसर्गसुंदर शांत वातावरणात वसलेले हे गाव म्हणून वर्णन करतात.

धन्य ते अरण। रत्नाची खाण। जन्माला निधान सावता तो।

गावची लोकसंख्या ५,००० आहे. गावातील

बहुतांश म्हणजे८०% लोक शेती करतात. गावामध्ये सामाजिक जीवन स्थिर स्थावर आहे. गावात मुख्य देवस्थान श्री सावता महाराज यांचे असून याशिवाय श्री खंडोबा, श्री मारुती, श्री महादेव, श्री ज्योतीबा व अंबाबाई इत्यादी मंदिरे आहेत.

**सावता महाराजांचेपूर्व चरित्र घराणे:**

महाराजांची वंशपरंपरा त्यांच्या आजोबापर्यंतची उपलब्ध आहे. दैवू माळी हे महाराजांचेआजोबा. जातीने हे हिंदू धर्मातील 'माळी' या समाजाचे होते. ते स्वत: पंढरीचे वारकरी होते. दैवू माळी यांना परसोबा आणि डोंगरोबा अशी दोन मुले होती. त्यापैकी डोंगरेबा भक्त-भाविकांबरोबर यात्रेला म्हणून जो गेला तो परत आलाच नाही. परसोबाचे आई-वडिल परसोबांना घेवून वारीला जात. पंचक्रोशीत राहणारे सदू माळी यांची मुलगी नांगिताबाई हिच्याशी परसोबांचा विवाह झाला. वडिलांप्रमाणे परसोबाही विठ्ठलभक्त होते. चंद्रभागेच्या वाळवंटात परसोबा देवाच्या किर्तनात दंग झाले. देवळात जायला त्यांना उशीर झाला. पुजारी दारेबंद करुन घरी गेले असता उभयंताची देवदर्शनाची कळकळ पाहून देवच द्रवला. 'तुम्हाला हवे ते मागा' असे देव त्यांना म्हणाला. परसोबाने स्वत:ला काहीच नको होते, पण नांगिताबाईने मात्र देवभक्त अशी पुत्राची मागणी केली. 'तुझी इच्छा पूरी होईल.' असा आशीर्वाद देवाने तिला दिला. देवाने दिलेला हा वर सुफळ संपूर्ण झाला. अशी आख्यायिका सांगितली जाते. नांगिताबाई योग्य वेळी प्रसूत झाली. तिला पुत्रलाभ झाला हे पुत्ररत्न म्हणजेसंत सावता महाराज.

**सावता महारांजाचा जन्मकाळ**

महाराजांची निश्चित जन्मतिथी व जन्मवेळ मिळत नाही. मात्र अरण या गावी शके ११७२ (इ.स.१२५०) मध्ये नांगिताबाई यांच्या पोटी महाराजांचा जन्म झाला. याविषयी सर्व अभ्यासकांचे एकमत आहे. संत नामदेव महाराजांनी सावतोबांच्या जन्माविषयी पुढील माहिती दिली आहे.

धन्य तेअरण । रत्नांचीच खाण ।
जन्मला निधान । सावता तो ॥
सावता सागर । प्रेमाचा आगर ।
घेतला अवतार । माळ्याघरी ॥

संत एकनाथांचीही साक्ष अशीच आहे.

माळीयाचे वंशी सावता जन्मला । पावन तोकेला वंश त्याचा ॥

सावता महाराज हेसंत मंडळातले वडीलधारे संत. निवृत्तीनाथ (इ.स.१२६८ ते१२९६), ज्ञानदेव (इ.स. १२७१ ते१२९३) व नामदेव (इ.स.१२७० ते१३५०) अशा या संताच्या आयुर्मर्यादा आहेत. सावता महाराज (इ.स.१२५० ते१२९५) त्यामुळे संत मंडळात ते ज्येष्ठच ठरतात. तसेच संत तुकारामाचा कालखंड शके १५२० तेशके १५७२ आहे. म्हणजे संत तुकारामापेक्षा संत सावतोबा ३८५ वर्षे अगोदर जन्मलेले होते. म्हणूनच संत सावता महाराजांना 'संत शिरोमणी ' असे म्हणतात. संत सावता महाराज यांच्या नावातील सावता हे नाव नेहमीच्या परिपाठातले दिसत नाही. म्हणून हे नामकरण अपूर्व म्हटले पाहिजे. या नावाचेमर्म शोधायचे म्हटले तरी तर्काने काही गोष्टी सांगता येतील. त्यातील एक सावता-'साव' म्हणजे 'सज्ञन' किंवा 'सभ्य ' किंवा 'संभावित'. सावता या नावात 'साव ' व 'ता' अशी दोन पदे कल्पिना येतील. 'ता' या भाववाचक प्रत्ययाचा अर्थ 'पणा' असा आहे. म्हणूनच सावता म्हणजे 'सभ्यपणा' असा होतो असे डॉ. हेमन विष्णू इनामदार यांनी 'संत सावता दर्शन' या ग्रंथात म्हटले आहे.

**संत सावता महाराजांचे वैवाहिक जीवन**

सावता महाराजांच्या घरात त्यांच्या वाड-वडिलांपासून विठ्ठलभक्ती नांदत होती. या भक्तीमय वातावरणात ते मोठे झाले. महाराजांच्या वयाच्या ६ व्या वर्षी परसोबांनी त्यांना पंतोजीच्या शाळेत घातले. पण काही कारणास्तव त्याचे शिक्षण संपुष्टात आले. पण

संस्काराचे शिक्षण मात्र त्यांना पुरेपूर मिळाले. वयात आल्यानंतर अरणजवळच्या 'भेंड' या गावचे' भानवसेरुप माळी' या घराण्यातील 'जनाई' या कन्येशी त्यांचा विवाह झाला. यथावकाश या दांपत्यास एक मुलगा( विठ्ठल) व एक मुलगी (नागाताई) झाली. मुलगा विठ्ठल हाही अकाली कालवश झाला. नागाताईकडूनच पुढचा वंश आजतागायत चालू आहे. असेसांगण्यात येते. पण त्यासाठी बलत्तर असा पुरावा उपलब्ध नाही.

**सावता महाराजांची बहुमोल शिकवण**

सावतोबा जरी माळयाचा व्यवसाय करीत असलेतरी त्यांचे चित्त पांडुरंग स्वरुप झालेहोते. त्याकाळचे संत आणि सावतोबा ह्यांच्यात एक महत्वाचा फरक होता. 'स्वत:च्या कर्तव्यात रत होणे हाच मोक्ष प्राप्तीचा मार्ग होय. ' ही शिकवणूक संत सावतोबांच्या अंगी बाणली होती. मोक्ष प्राप्तीसाठी संसार सोडण्याची गरज नाही, पंढरीला जाण्याची गरज नाही ही त्यांची श्रध्दा होती. त्यांना आपल्या शेतात, मळ्यात, उगवलेल्या कांदा, मुळा, भाजीत सगळीकडे विठ्ठलच दिसत होता. भक्तीप्रेमाच्या साहाय्याने दृष्टीवरील भ्रमाचा पडदा दूर झाला की सर्वत्र परमेश्वराचा साक्षात्कार होऊ लागतो. ही त्यांची प्रचिती होती. 'कर्तव्य हाच ईश्वर ' ही त्यांची निष्ठा होती.

कांदा, मुळा, भाजी ।
अवघी विठाई माझी ।।
लसूण, मिरची, कोथिंबरी ।
अवघा झाला माझा हरी ।।
ऊस, गाजर, रताळू ।
अवघा झालासेगोपाळू ।।
मोट, नाडा, विहीर, दोरी ।
अवघी व्यापिली पंढरी ।
सावता म्हणेकेला मळा ।
विठ्ठल पायी गोविला गळा ।।

ही सावतोबाच्या भक्तीची निष्ठा होती. ह्या निष्ठेमुळेच सावतोबाला आपल्या मळ्यातच देवाचेदर्शन घडत असे. 'कर्म हीच पूजा' आपल्या कर्तव्याचा विसर पडू न देणे हाच ईश्वर प्राप्तीचा मार्ग. संत सावता महाराजांनी स्वधर्माचा योग्य मार्ग दाखवून जनतेला समर्थ केले. ही संत सावतोबांची बहुमोल कामगिरी होय.

'विहीत कर्म हाच भागवत धर्म ' ही बहुमोल शिकवण त्यांनी दिली. म्हणून अद्यापही पंढरपूरहून त्यांना भेटण्यासाठी पालख्या अरणला येतात. इहलोकीचेजीवन समृध्द करण्यासाठी निस्सीम प्रयत्न केल्यावाचून गत्यंतर नाही ही बहुमोल शिकवण त्यांना दिली व तेच आचरण त्यांनी केले.

सावता महाराजांचेअभंग संख्येने थोडे आहेत. यांच्या आयुष्यातील मोजकेच घटना प्रसंग आजवर ज्ञात झाले आहे. त्यांचे कर्तृत्व आणि जीवन कर्तृत्व या दोन्ही ठिकाणी शब्द वर्णनापेक्षा मौनाचीच भाषा अधिक आहे. पण हेमौन बोलके आहे. ही स्तब्धता सूचक आहे.

**जीवन दृष्टी**

सावता महाराजांची जीवनदृष्टी पुरोगामी होती. त्याची शिकवण कर्तव्यनिष्ठेला व सामाजिक नीतीमत्तेला पोषक आहे. जाती, धर्मपालन, समताधिष्ठित , भक्तीयोग, सद्गुण संवर्धन व दुर्गुण, त्याग यांचे वस्तूपाठ त्यांच्या चरित्रात आणि कवित्वात पहायला मिळतात. त्यांचे पारमार्थिक विचार ग्रांथिक ज्ञानापेक्षाही जीवनांच्या प्रत्यक्षानुभूतीला स्फुरलेलेआहे. त्यांचा मळा हाच त्यांच्या लेखी विठ्ठल होता. मोट, नाडा, विहीर, दोरी या वस्तूनीच त्यांच्या दृष्टीने अवघी पंढरी व्यापून टाकली होती. परमेश्वराच्या प्राप्तीसाठी जपतप, क्रियाधर्म , व्रतवैकल्य, समाधी मार्ग, आष्टांग योग हेसर्व व्यर्थ निरर्थक आहे. असे सावता सांगतात. अन्य मार्गापेक्षा भक्तिमार्गाची महती सावतोबांना अधिक जाणवतो. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल सावता महाराजांच्या व्यक्तिमत्वात सतत जाणवत राहतो.

**आयुष्याची अखेर**

संत सावता महाराज ज्ञानदेवाप्रमाणेच इच्छा मरणी होते. आपले अवतारकार्य त्यांनी योग्य वेळी पूर्ण केले. आषाढ वद्य चतुर्दशी शके १२१७(दिनांक १२ जुलै १२९५) या दिवशी अरण मुक्कामीच सावता महाराजांनी जिवंत समाधी घेतली. इ.स.१२५० ते१२९५ असे पंचेचाळीस वर्षाचे सफल जीवन त्यांनी कंठले. एका अलौकीक आयुष्याची परिसमाप्ती झाली.

**अरण येथील संत सावता महाराज मंदिर**

श्री सावता माळी यांच्या जन्माने अरण हे गाव पुनीत झाले असून तेथे संत सावता बुवांनी शके १२१७ मध्ये जीवंत समाधी घेतली. तेव्हापासून तेथे एका निवडुंगाचे झाड व दगडी ओटा होता. अरण येथील कै. नामदेव आण्णा माळी हे संत सावता महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांना या ठिकाणी एक मंदिर असावे असे वाटत असल्याने मंदिराचे काम शके १८०९ मध्ये सुरु केले व असंख्य भाविकांच्या मदती नेते शके १८१० मध्ये पूर्ण झाले. हे मंदिर अरण गावच्या उत्तर टोकास आहे.

**मंदिराचे प्रवेशद्वार**

विहिरीला लागूनच मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार आहे. विहिरीच्या कट्यावरुन देवळाचा कळस शोभिवंत दिसतो. मंदिराला चारही बाजूंनी बऱ्यापैकी तटबंदी केलेली आहे. मागील बाजूने प्रवेश करण्यासाठी एक छोटेदार आहे. विहिरीजवळचे मुख्य प्रवेशद्वार मात्र प्रशस्त व मजबूत अ ाहे.

**मंदिराचेआवार**

प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर प्रशस्त आवार दिसते. दगडी कोटाला लागून आत खोल्या काढलेल्या आहेत. त्यांचेबांधकाम ओवरीसारखेआहे. आवार स्वच्छ आणि प्रसन्न आहे.

**मंदिराचा सभामंडप**

आवारातून मंदिरात शिरताना आरंभी उत्कृष्ट सभामंडप आहे. दोन्ही बाजूंच्या कडांना समोरासमोर ताशीव लाकडी खांब आहेत. सभागृहाची जमीन स्वच्छ , एकसारखी व प्रशस्त आहे. भिंतीवर (दोन्ही बाजूंना) साधूसंतांच्या तसबिरी आहेत.

**मंदिराचा गाभारा**

सभामंडपातून गाभाऱ्याकडे जाणारी पाऊलवाट अरुंद पण सोयीस्कर आणि छोटीशीच आहे. गाभाऱ्यात शिरल्यावर सोनेरी टोपाची मूर्ती प्रथम दिसते. हा टोप ज्या जागेवर ठेवला आहे, तेच सावता महाराजांचे समाधी स्थान आहे. टोपाच्या मागील बाजूस श्री विठ्ठल मूर्ती आहे. टोपाच्या भोवताली अर्धवर्तुळाकार असे जे सुरेख मखर केलेले आहे. मंदिराचा हा मुख्य गाभारा व त्यांच्या ठेंगण्या प्रवेशद्वाराजवळची जमीन संगमरवरी फरशीची घडविलेली आहे. मंदिराभोवती महाराजांचा प्रसिध्द ‘भक्तीचा मळा’ असून तो सध्या त्यांच्या वंशजांकडे विभागला गेला आहे. तसेच समोरील बाजूस महाराजांनी पाडलेली विहीर असून दुष्काळतही सदर विहीरीचे पाणी आटत नाही. मंदिराच्या शिखरावर अनेक देवदेवतांची रंगीत कलाकृती पहावयास मिळते.

**अरण काला यात्रा सोहळा**

सावता महाराजांनी इ.स.१२९५ साली जिवंत समाधी घेतली. मित्ती आषाढ वद्य १४ शके १२१७ या समाधी कालापासून गेली ७०० वर्षापासून आजतागायत त्यांचे समाधी प्रसंगा निमित्त एक काला यात्रा व चंदन उटी या दोन यात्रा प्रतिवर्षी भरतात. या गावावरुन अनेक महान संतांच्या पालख्या व दिंड्या आषाढी वारीस पंढरपूरास जातात. त्यामध्ये श्री एकनाथ महाराज , पैठण व परतीच्या प्रवासात श्री गजानन महाराज शेगाव ह्या प्रमुख पालख्या आहेत. परंतु वैशिष्ट म्हणजे इतर अनेक संतांप्रमाणे श्री सावता महाराज यांच्या पुण्यतिथीस (आषाढ वद्य चतुर्दशी) श्री पांडुरंगाची पालखी येथ येते. या कालावधीत सप्ताह, भजन, किर्तन, प्रवचन -जागर, ग्रंथ पारायण असे कार्यक्रम होतात.

क्षेत्र अरण येथील दही-हंडी परंपरा मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. हंडीमधून दहीकाला काढून घेण्याचा मान श्री अरणकरण यांना दिला जातो. यामध्ये गवळणी संपल्यानंतर संतपर अभंग म्हणून 'जय विठ्ठल होते'. काला वाटून एकमेकांना वैष्णव निळा संभ्रम हा अभंग जातो. तसेच या कालावधीमध्ये सावता महाराजांची पालखी नगर प्रदक्षिणेला निघते. त्याच्या मागे पांडुरंगाची पालखीही निघते. यामध्येअभंग, गवळणी, विविध देवतांच्या , संतांच्या आरत्या, भारुडे, रिंगण असे विविध कार्यक्रम होतात. पांडुरंगाच्या पालखीचा परतीच्या प्रवासावेळी एकमेकांना साखर-गुळ, पेढेवाटतात, तसेच फडकरी, सेवाधारी पदाधिकारी यांना नारळ प्रसाद म्हणून दिला जातो.

पंढरीच्या पांडुरंगास ग्रीष्म ऋतूत चंदनउटी लावतात. तशी चंदनउटी सावता महाराजांना केली जाते. त्यास 'उटी यात्रा ' म्हणतात. ही यात्रा तीन दिवस चालते. (चैत्र वद्य१० ते चैत्र वद्य १२) तसेच गावामध्येमार्गशीर्ष महिन्यांत चंपाषष्ठीस श्री खंडेरायांची मोठी यात्रा भरते, वाघ्या मुरळीचे गायन, गजी-ढोल , रथ छबीना, खेळाच्या स्पर्धा, बैल गाड्या स्पर्धा, कुस्त्याचा फड असेआकर्षक कार्यक्रम होतात.

**समारोप**

वरील सर्व माहितीवरुन अरणगावाला धार्मिकतेचा वारसा लाभलेला दिसून येतो. श्री संत सावता महाराजांची शिकवण ही गावाला मोलाची ठरलेली आहे. वारकरी सांप्रदयाची विचारप्रणाली आणि आचारसंहिता यांचा प्रत्यय संत सावता महाराजांच्या जीवन चरित्रातून आणि कार्य कर्तृत्वातून नेमकेपणाने येतो. वारकरी संतामध्ये वयाने अनुभवाने आणि महाराजांनी आपल्या व्यक्तिमत्वातून वारकरी सांप्रदयाला प्रगतीची अमृत संजीवनी प्राप्त करुन दिली.

**संदर्भ साधने**


- संत सावता दर्शन, डॉ. हेमंत विष्णू इनामदार.
- पंढरपूरचेसांस्कृतिक वैभव, प्रा.डॉ.जयश्री रणनवरे.
- श्री सावता महाराज महात्म्य, भिकू सावळाराम.
- श्री संत शिरोमणी सावता महाराजांचे चरित्र, पोपटबुवा दगडू नाजणे.
- सावतानेकेला मळा, ग.ढ.माळी.
- संत शिरोमणी श्री सावता चरित्र, गोविंद विठ्ठल राऊत.
- श्री सावता माळी चरित्र, संतकवी श्री दासगणू महाराज.
- श्री नामदेव महाराज आणि त्यांचे समकालीन संत, जगन्नाथ रघुनाथ आजगावकर.
- संत सावता माळी, शिवराम वाशीकर.
- स्मरणिका(श्री संत सावतामाळी महाराज समाधी मंदिर जीर्णोद्वार)
- लोकमत दिवाळी अंक, तीर्थ पर्यटन -२००४.